महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# दिनांक 18/04/2025

1 वडखळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/04/2025 रोजी 01:00 वा च्या सुमारास मौजे सांलिदे फिर्यादी यांचे राहते घरातुन ता.पेण येथे कोणीतरी अज्ञात चोराटयाने फिर्यादी हे झोपले असताना गरमी असल्याने घराचे लोखंडी ग्रिल नसल्याने उघडया ठवलेल्या खिडकीवाटे घरात प्रवेश करुन मोबाईल फोन व सोन्याचे दागिने असा एकूण 9,500/-रुपये किंमतीचे स्वत:चे फायदयाकरिता चोरुन नेले आहे.

याबाबत वडखळ पोलीस ठाणे गुरनं.36/2025 भा.दं.वि.क.305 A प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/गायकवाड हे करीत आहेत.

2. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/04/2025 रोजी 16:45 वा च्या सुमारास मौजे-भिसेगाव खिंडीतील फळाचे दुकानावर ता.कर्जत येथे महिला फिर्यादी रा.कातकरवाडी भिसेगाव ता.कर्जत त्यांची मुलगी व दोन नाती असे त्यांचे भिसेगाव खिंडीतील फळाचे दुकानावर हजर असताना आरोपीत हा काहीएक कारण नसताना तेथे येवून शिवीगाळ करू लागला म्हणून फिर्यादी यांचे मुलीने त्यास शिवीगाळी का करतोस असे विचारले असता त्या गोष्टीचा आरोपीत यास राग आल्याने त्याने तेथे असलेले वजन काटा फिर्यादी यांची जखमी नं.01मुलगी ज्योति हिचे डोक्यात मारून दुखापत केली व फिर्यादी यांची जखमी नं.02 नात काजल हिस हाताबुक्याने मारहाण करून त्यांची दुसरी नात जखमी नं.03 वेदिका हिचे नाकावर वजन काटा मारून दुखापत करून फिर्यादी यांना देखील हाताबुक्याने मारहाण करून एकएकेकाला मारून टाकेन अशी धमकी दिली. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक 17/04/2025 रोजी 23:55 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.105/2025, भारतीय न्याय संहीता कलम 118(1), 115(2),352,351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/काठे हे करीत आहेत.

3. रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 16/04/2025 रोजी 18:30 वा ते दि.17/04/2025 रोजी 18:30 वा च्या दरम्यान मौजे वनवली ता.अलिबाग येथील फिर्यादी रा. 5ई दमयंती निवास ,2री दुभाषलेन व्हि.पी.रोड मुंबई यांचे सर्वे नं.51/3 या मिळकती पंप हाउस मध्ये वनवली अलिबाग येथे फिर्यादी यांचे 27,500/-रुपये किंमतीचे कंपाउड करण्यासाठी पंप हाउस मध्ये ठेवलेले साहित्य कोणीतरी अज्ञात चोरटयाने पंप हाउस च्या उघडया खिडकीतुन सदरचे समान लबाडीचे इरादयाने फिर्यादीचे संमतीशिवाय स्वताचे फायदयाकरीता चोरी करुन नेले.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे गुरनं.42/2025, भारतीय न्याय सहीता 2023 चे कलम 305(a) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/दिनेश पिंपळे हे करीत आहेत.

4. नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 16/04/2025 रोजी 20:15 वा च्या सुमारास मौजे धामोते गावच्या हददीत श्री.सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स प्लेंट ने-402 चौथा मजला धामोते,ता.कर्जत येथील महिला फिर्यादी हया घरी एकटयाच असताना आरोपीत रा.धामोते ता.कर्जत याने फिर्यादी यांना तुमच्या फ्लॅटच्या स्लायडिंग खिडक्या चेक करायच्या आहेत असा बहाणा करुन फिर्यादी या फ्लॅटमध्ये एकटया असल्याचा फायदा घेवुन फ्लॅटमध्ये जावुन हॉल बेडरुम व किचनच्या स्लायडींग खीडक्या चेक केल्या नंतर आरोपीत हा पुन्हा बेडरुममध्ये गेला असता फिर्यादी यांनी आरोपीत यास बाहेर जाण्यास सांगुन फिर्यादी या किचनरुम मधुन बाहेर हॉलमध्ये येत असताना आरोपीत हा बेडरुममधुन बाहेर येवुन फिर्यादी यांचे मागे येवुन फिर्यादी यांना मिठी मारुन तु मला आवडतेस असे बोलुन फिर्यादी यांचे मनास लज्जा उत्पन्न केली. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक 18/04/2025 रोजी 00:47 वा च्या सुमारास अटक करण्यात आली.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे गुरनं.62/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 74,333 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/कदम हे करीत आहेत.

5. अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/04/2025 रोजी 15:30 वा च्या सुमारास मौजे मानी फाटा येथे अलिबाग मांडवा रस्त्यावा, ता.अलिबाग येथे इनोव्हा कार क्रं एम एच 02 डीजे 8121 वरिल आरोपी चालक रा.सांताक्रुज मुंबई याने मांडवा दिशेने जाणा-या दुचाकी क्रं एम एच 06/बी.एस 5241 हिला मागुन धडक देवुन दुचाकी वरिल मयत पुरुष व महिला इनोव्हा कार खाली फरफटत जात असताना इनोव्हा वाहनाचा ब्रेक मारुन थांबविणे आवश्यक असताना तसे न करता आरोपीत याने मयत क्र.01 विश्वास सदाशिव पाटील , वय 52, रा. रा.नवेदरबेली, ता.अलिबाग व 02 कल्पना विश्वास पाटील, वय-50, रा.नवेदरबेली, ता.अलिबाग यांना फरफटत नेल्यामुळे त्याचा मत्यु होवु शकतो हे माहीत असताना वाहन न थांबवता पुढे चालवत घेवुन गेला व रोडच्या साईडला असणारे स्पीड ब्रेकरचे फलक दाखवणा-या लोखंडी दांडयाला ठोकर मारुन अपघात केला सदर अपघातात दुचाकीवरील मयत पुरुष व महिला यांना गंभीर दुखापती होवुन ते दोघेही मरण पावले व दोन्ही वाहनांचे नुकसान झाले.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.67/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 106(2),281,125(a),125(b),324(4)(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/श्री.शिंपने हे करीत आहेत

## वाहतूक केसेस

दिनांक 17.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 262 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,53,700/-रुपये इतका दंड आकारला आहे.